Impact Factor-7.675 (SJIF)
ISSUE No- (CCCXVIII) 318 (C)

ISSN-2278-9308
September-2021

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refreed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

## Thoughts and Works of Dr. Babasaheb Ambedkar




**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director

**Editor**
Dr. Pramod S. Meshram
I/c Principal,

**This Journal is indexed in :**
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

| | | |
|---|---|---|
| 56 | Annihilation of Caste System in India: A Perspective of Dr. B. R. Ambedkar **Dr. Nisargandh Prabhakar** | 228 |
| 57 | Dr. Ambedkar's Vision For Uniform Education In India **Dr. Prem Bhagwan Acharya** | 232 |
| 58 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित चळवळीचे प्रेरणास्रोत **मनिष आत्माराम आवसरमोल** | 236 |
| 59 | स्त्री स्वातंत्र्याचे उद्‌गाते बाबासाहेब **प्रा. डश. शर्मिला बाळासाहेब घाटगे** | 238 |
| 60 | आंबेडकरवादी मातंग लेखिका शकुंतला वायदंडे **प्रा. डॉ. शरद गायकवाड** | 243 |
| 61 | बहिष्कृत भारतकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर **विकास गवई** | 247 |
| 62 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नियोजन व समाजकल्याण विषयक विचार **प्रा. डॉ.तरोडे विजय लक्ष्मण** | 252 |
| 63 | मानवी स्वातंर्त्याचे कैवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर **प्रा. डॉ. वसुमती पी. पाटील** | 255 |
| 64 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा मुस्लीम मराठी कवितेवरील प्रभाव **प्रा. वंदना सांडूराव पाटील** | 258 |
| 65 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री विषयक विचार **प्रा.श्री.वैभव नानासाहेब कांबळे** | 264 |
| 66 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगार विषयक विचार आणि कार्य **प्रा. सुनिल भालेराव पाटील** | 268 |
| 67 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जातीअंताची चळवळ **सिध्दार्थ विठ्ठलराव मस्के** | 273 |
| 68 | महिला उध्दाराचे पुरस्कर्ते - डॉ.बाबासाहेब आंबेडकर **डॉ. शुभांगी एस्. माने** | 276 |
| 69 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा दलित साहित्यावरील प्रभाव **भूषण प्रदीपकुमार देशमुख /डॉ. वंदना स. भोयर** | 281 |
| 70 | आंबेडकरवादी स्वकथन : आठवणीचे पक्षी **डॉ. शिवराज काचे** | 285 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 318 (CCCXVIII) C
ISSN : 2278-9308
September, 2021

# स्त्री स्वातंत्र्याचे उद्गाते बाबासाहेब

प्रा. डॉ. शर्मिला बाळासाहेब घाटगे
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज.मोबा : 9552533640

भारताचे थोर सुपुत्र व अस्पृश्य समाजाचे धुरंधर कैवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची २०१६ हे वर्ष १२५ वी जयंती वर्ष राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर साजरी करण्यात येत आहे. त्यांचा जन्म १४ एप्रिल, १८९१ रोजी झाला व त्यांचे महानिर्वाण ६ डिसेंबर, १९५६ रोजी झाले. आपल्या ६५ वर्षाच्या जीवनात त्यांनी केलेले बहुविध कार्य आजही संस्मरणीय आहे. अस्पृश्य समाजात जन्म घेणाऱ्या व्यक्तीला किती बिकट परिस्थितीतून जावे लागते, याचा प्रत्यय बाबासाहेबांना बालपणापासून होता. कमालीचे दारिद्र्य, समाजाकडून होणारी पिळवणूक, अन्याय, अत्याचार, पदोपदी सहन करावा लागणारा अपमान, सामाजिक उपेक्षा, त्यांचे चटके त्यांना सतत सहन करावे लागे. अत्यंत हलाखीच्या बिकट परिस्थितीतून प्राप्त केलेल्या बुद्धिमत्तेने त्यांना येणाऱ्या सर्व अडचणींना तोंड देऊन अभुतपूर्व यश संपादन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शैक्षणिक प्रवास सत्तावीस वर्षाचा होता. त्यांनी बी. ए., एम. ए., पीएच्. डी., एम्म्. एस्सी., डी. एस्सी. आणि बार-□ट-लॉ अशा एकापेक्षा एक श्रेष्ठ पदव्या सत्तावीस वर्षात प्राप्त केल्या. बी. ए. ही पदवी त्यांनी मुंबई विद्यापीठातून प्राप्त केली. तर अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठातून एम्. ए., पीएच्. डी. या पदव्या संपादन केल्या. एम. एस्सी., डी. एस्सी. या पदव्या ब्रिटनमधील लंडन विद्यापीठाच्या आहेत. तर बार-□ट-लॉ ही त्यांची कायद्याची सर्वोच्च पदवी लंडनमधील 'ग्रज इन' या कायदाविषयक संस्थेची आहे.

विद्यार्थीदशेनंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हजारो वर्षे हीनतेची वागणूक मिळणाऱ्या आपल्या अस्पृश्य जमातीचे नेतृत्त्व करून व जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत ह्या अंगीकारेल्या दलितोदधाराच्या कार्यासाठी त्यांनी देह आणि बुद्धी झिजवली. आपली बुद्धी, वाणी व लेखणी या आपल्या सामाजिक कार्यासाठी अखेरपर्यंत झिजवली. सतत वाचन, मनन आणि चिंतन यामुळे त्यांच्या विचारात प्रगल्भता आली. आपले बोललेले आणि लिहिलेले विचार फोल ठरणार नाही, हे पक्के ठरवून ते बोलत व लिहीत असत. हिंदू समाजाच्या सर्व शोषण प्रवृत्तीविरू त्यांनी बंड उभारून आपल्या दलित समाजासाठी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व आर्थिक हक्क मिळविण्यासाठी अथक प्रयत्न केले. ग्रंथ, वृत्तपत्रे आणि जाहीर सभा या माध्यमांचा उपयोग त्यांनी अन्यायाची जाणीव समाजाला करून देण्यासाठी केली. बाबासाहेबांनी आपल्या अनुयायांना 'शिक्षण, संघटन व संघर्ष' हा महामंत्र दिला. हा त्यांच्या जीवनातील परमोच्च क्षण ठरला. याच दिवशी त्यांनी लाखो अनुयायांना धर्मदीक्षा देऊन स्वातंत्र्य, समता व बंधुता या मानवतेच्या मूल्यांचे परिपालन करणाऱ्या नव्या विश्वधर्मात आपल्याबरोबर असंख्य दलित बांधवांना नेऊन मुक्तिसंग्रामाची सांगता केली.

२५ डिसेंबर, १९२७ रोजी २ दिवसीय अधिवेशन सुरू झाले. यात त्यांनी पहिल्याच दिवशी उपदेशपर भाषणात स्त्रियांना त्यांच्या हक्काची जाणीव करून दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्यासाठी स्वतंत्र भाषण केले. "तुमच्यापोटी जन्म घेणाऱ्या मुलांना चांगली नोकरी कशी मिळेल याची काळजी तुम्ही घेतली पाहिजे. तुमच्या पुरुषांप्रमाणे तुम्ही सुद्धा समाजोन्नतीचा निश्चय करा. तुमच्या वागणुकीच्या जुन्या आणि गलिच्छ चालीरिती बदलल्या पाहिजेत. ते अस्पृश्य आहेत असे ज्यामुळे वाटते त्या सर्व गोष्टी बदलल्या पाहिजेत. तुम्ही लुगडी नेसण्याची पद्धत बदलली पाहिजे. स्पृश्य बायकाप्रमाणे लुगडी नेसली पाहिजेत. कोपरभर व गळाभर कथलाचे किंवा चांदीचे दागिने घालण्यापेक्षा कमीत कमी व सोन्याचे दागिने घातले पाहिजेत. चांगले, स्वच्छ व व्यवस्थित कपडे वापरले पाहिजेत. गृहलक्ष्मी म्हणून तुम्ही घरात कुठलीही अमंगल गोष्ट होऊ नये म्हणून काळजी घेतली पाहिजे. आपल्या मुलांना शिक्षण देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पुरुषांबरोबर तुम्हीसुद्धा ज्ञान, विद्या मिळवली पाहिजे. 'खाण तशी माती' याचा अर्थ समजून घेऊन आपली पुढची पिढी सुधारण्यासाठी तुम्ही मुलींना देखील शिक्षण दिले पाहिजे. तुम्ही उद्या सकाळी आपल्या गावी परत जाताना तुमच्या कपडे घालावयाच्या पद्धतीत चांगला बदल झाल्याचे मला

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 318 (CCCXVIII ) C
ISSN : 2278-9308
September, 2021

# स्त्री स्वातंत्र्याचे उद्गाते बाबासाहेब

प्रा. डॉ. शर्मिला बाळासाहेब घाटगे
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज.मोबा : 9552533640

भारताचे थोर सुपुत्र व अस्पृश्य समाजाचे धुरंधर कैवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची २०१६ हे वर्ष १२५ वी जयंती वर्ष राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर साजरी करण्यात येत आहे. त्यांचा जन्म १४ एप्रिल, १८९१ रोजी झाला व त्यांचे महानिर्वाण ६ डिसेंबर, १९५६ रोजी झाले. आपल्या ६५ वर्षाच्या जीवनात त्यांनी केलेले बहुविध कार्य आजही संस्मरणीय आहे. अस्पृश्य समाजात जन्म घेणाऱ्या व्यक्तीला किती बिकट परिस्थितीतून जावे लागते, याचा प्रत्यय बाबासाहेबांना बालपणापासून होता. कमालीचे दारिद्र्य, समाजाकडून होणारी पिळवणूक, अन्याय, अत्याचार, पदोपदी सहन करावा लागणारा अपमान, सामाजिक उपेक्षा, त्यांचे चटके त्यांना सतत सहन करावे लागे. अत्यंत हलाखीच्या बिकट परिस्थितीतून प्राप्त केलेल्या बुद्धिमत्तेने त्यांना येणाऱ्या सर्व अडचणींना तोंड देऊन अभुतपूर्व यश संपादन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शैक्षणिक प्रवास सत्तावीस वर्षाचा होता. त्यांनी बी. ए., एम. ए., पीएच्. डी., एम्म्. एस्सी., डी. एस्सी. आणि बार-□ट-लॉ अशा एकापेक्षा एक श्रेष्ठ पदव्या सत्तावीस वर्षात प्राप्त केल्या. बी. ए. ही पदवी त्यांनी मुंबई विद्यापीठातून प्राप्त केली. तर अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठातून एम्. ए., पीएच्. डी. या पदव्या संपादन केल्या. एम. एस्सी., डी. एस्सी. या पदव्या ब्रिटनमधील लंडन विद्यापीठाच्या आहेत. तर बार-□ट-लॉ ही त्यांची कायद्याची सर्वोच्च पदवी लंडनमधील 'ग्रज इन' या कायदाविषयक संस्थेची आहे.

विद्यार्थीदशेनंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हजारो वर्षे हीनतेची वागणूक मिळणाऱ्या आपल्या अस्पृश्य जमातीचे नेतृत्त्व करून व जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत ह्या अंगीकारेल्या दलितोदधाराच्या कार्यासाठी त्यांनी देह आणि बुद्धी झिजवली. आपली बुद्धी, वाणी व लेखणी या आपल्या सामाजिक कार्यासाठी अखेरपर्यंत झिजवली. सतत ाचन, मनन आणि चिंतन यामुळे त्यांच्या विचारात प्रगल्भता आली. आपले बोललेले आणि लिहिलेले विचार फोल रणार नाही, हे पक्के ठरवून ते बोलत व लिहीत असत. हिंदू समाजाच्या सर्व शोषण प्रवृत्तीविरू त्यांनी बंड उभारून पल्या दलित समाजासाठी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व आर्थिक हक्क मिळविण्यासाठी अथक प्रयत्न केले. ग्रंथ, पत्रे आणि जाहीर सभा या माध्यमांचा उपयोग त्यांनी अन्यायाची जाणीव समाजाला करून देण्यासाठी केली. ासाहेबांनी आपल्या अनुयायांना 'शिक्षण, संघटन व संघर्ष' हा महामंत्र दिला. हा त्यांच्या जीवनातील परमोच्च ठरला. याच दिवशी त्यांनी लाखो अनुयायांना धर्मदीक्षा देऊन स्वातंत्र्य, समता व बंधुता या मानवतेच्या मूल्यांचे ालन करणाऱ्या नव्या विश्वधर्मात आपल्याबरोबर असंख्य दलित बांधवांना नेऊन मुक्तिसंग्रामाची सांगता केली.

२५ डिसेंबर, १९२७ रोजी २ दिवसीय अधिवेशन सुरू झाले. यात त्यांनी पहिल्याच दिवशी उपदेशपर ात स्त्रियांना त्यांच्या हक्काची जाणीव करून दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्यासाठी स्वतंत्र भाषण तुमच्यापोटी जन्म घेणाऱ्या मुलांना चांगली नोकरी कशी मिळेल याची काळजी तुम्ही घेतली पाहिजे. तुमच्या माणे तुम्ही सुद्धा समाजोन्नतीचा निश्चय करा. तुमच्या वागणुकीच्या जुन्या आणि गलिच्छ चालीरिती ा पाहिजेत. ते अस्पृश्य आहेत असे ज्यामुळे वाटते त्या सर्व गोष्टी बदलल्या पाहिजेत. तुम्ही लुगडी नेसण्याची दलली पाहिजे. स्पृश्य बायकाप्रमाणे लुगडी नेसली पाहिजेत. कोपरभर व गळाभर कथलाचे किंवा चांदीचे ालण्यापेक्षा कमीत कमी व सोन्याचे दागिने घातले पाहिजेत. चांगले, स्वच्छ व व्यवस्थित कपडे वापरले गृहलक्ष्मी म्हणून तुम्ही घरात कुठलीही अमंगल गोष्ट होऊ नये म्हणून काळजी घेतली पाहिजे. आपल्या ोक्षण देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पुरुषांबरोबर तुम्हीसुद्धा ज्ञान, विद्या मिळवली पाहिजे. 'खाण तशी ा अर्थ समजून घेऊन आपली पुढची पिढी सुधारण्यासाठी तुम्ही मुलींना देखील शिक्षण दिले पाहिजे. तुम्ही ठी आपल्या गावी परत जाताना तुमच्या कपडे घालावयाच्या पद्धतीत चांगला बदल झाल्याचे मला

पाहावयास मिळाले पाहिजे."[1] अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्योद्धार होईल अशी परिवर्तनाची दिशा स्त्रियांना सांगितली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानात पुरुष आणि स्त्री ह्यांना समान अधिकार आहेत. भारतीय संविधानात आजच्या स्त्रीच्या अस्मितेसाठी, अस्तित्वासाठी त्यांनी तरतूद करून ठेवली. हिंदू धर्मातील व समाजव्यवस्थेतील स्त्री-विटंबनेविरूद्ध त्यांना राग येत असे. स्त्रियांना शिक्षण नाही, वारसा हक्क नाही, पुनर्विवाह हक्क नाही, तसेच इतर कोणतेच मानवी हक्क नाहीत, हे पाहून त्यांनी 'स्त्री मुक्तीसाठी हिंदू कोड बिल' तयार करून सादर केले. भारतीय स्त्री समाज आपल्या पारंपरिक पारतंत्र्याकडून मुक्त करणाऱ्या या थोर युगप्रवर्तक महापुरुषांची आठवणीची ज्योत कायम तेवत ठेवतील, यात कोणतीच शंका नाही.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नारीमुक्तीसाठी लढणारे एक लढवय्या होते. म. फुल्यांचा वारसा त्यांच्याजवळ होता. बाबासाहेब आपल्या पत्नीला (रमाबाईंना) लिहिलेल्या एका पत्रात म्हणतात, "मी नारी उन्नतीसाठी व नारी मुक्तीसाठी लढणारा एक योद्धा आहे. स्त्रियांची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी आवश्यक तो संघर्ष केला, ज्याचा मा सार्थ अभिमान आहे."[2] बाबासाहेबांनी फक्त दलित स्त्री नजरेसमोर ठेवली नाही तर एकूणच स्त्रियांच्या मुक्तीसाठी 'हिंदू कोड बिला'ची रचना केली. पण त्याला डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी विरोध दर्शविला. या विरोधाला न डगमगता एकटेपणाने संघर्ष करीत राहिले. आंबेडकरांनी 'भगवान बुद्ध आणि त्याचा धम्म' या महान ग्रंथाची निर्मिती करून आजच्या स्त्रीला आचरणाची एक नवी दिशा दाखविली. स्त्रियांचा न्यूनगंड दूर करण्याचा आटोकाट प्रयत्न बाबासाहेबांनी केला. स्त्री ही फक्त चूल व मूल सांभाळणारी नसून ती एक महान शक्ती आहे. तिच्याकडे असणाऱ्या सर्जनशक्तीची ओळख पुरुषी संस्कृतीला नाही. अन् तिने अनेक महामेरू जन्माला घातले. अनेक वेदना, सुख-दुःख सहन करून पुरुषांना घडविले. तिच्या अंगी असलेल्या अनेक सुप्त गुणांना वाव मिळाला, विकासाच्या दृष्टीने नवनवीन दिशा तिला प्राप्त झाल्या तर अनेक क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करण्याचे मनोधैर्य स्त्रियांमध्ये असे, असे बाबासाहेबांनी स्पष्ट केले. बाबासाहेब सतत स्त्रियांशी चर्चा करताना स्त्रीने स्वतःचे अस्तित्व, अस्मिता, सामाजिक दर्जा उंचावण्याची आणि राहणीमान बदलण्याचा उपदेश करत असत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत स्त्रीला प्रमुख स्थान दिले व स्त्री हाच या समाजाचा (दलितांचा) उद्धार करील, असा आत्मविश्वास त्यांना होता. सामाजिक समतेच्या आंदोलनात स्त्री-पुरुष समानता यावर फुले, आगरकरांनी जितका भर दिला तितकाच भर 'हिंदू कोड बिला'च्या रूपाने आंबेडकरांनी स्त्री-मुक्तीच्या संदर्भात दिलेला होता. स्त्री शिकली, सवरली तर कर्मकांड, अंधविश्वास दूर करेल, यावर त्यांची प्रगाढ श्रद्धा होती.

बाबासाहेबांना स्त्री वर्गावरचा अन्याय सतत टोचत होता. म्हणून त्यांनी केवळ उपदेशपर भाषणेच दिली नाहीत. तर स्त्री वर्गामध्ये क्रांती व्हावी, आमुलाग्र बदल व्हावा, तिच्यात नवचैतन्य निर्माण व्हावे, तिच्यातला स्वाभिमान जागा व्हावा, तिने स्वतःच्या अस्तित्वासाठी झगडले पाहिजे, यासाठी कसोशीने बाबासाहेबांनी प्रयत्न केले. 'हिंदू कोड बिला'च्या रूपाने त्यांनी स्त्रियांच्या समान हक्कांवर शिक्कामोर्तब केले. स्त्रियांना पुरुषांप्रमाणे प्रत्येक क्षेत्रात समान हक्क व दर्जा मिळावा, अशी तरतूद कायद्यात केली.

आंबेडकरांनी १९३६ साली येवले येथे धर्मांतराची घोषणा केली. त्यावेळी त्यांच्या अनुयायांनी देवतांना वाहिलेल्या पुरुष व स्त्रिया यांना धर्मांतरास प्रवृत्त करण्यासाठी त्यांची एक सभा मुंबईस दामोदर हॉलमध्ये आयोजित केली. या सभेमध्ये आंबेडकरांचे भाषण झाले. त्यात त्यांनी वेश्येचा धंदा करून पोट भरणाऱ्या स्त्रियांना बाबासाहेब म्हणाले, "आमच्याबरोबर तुम्ही धर्मांतर करणार की नाही, याबद्दल मला मुळीच पर्वा नाही. तुम्ही महार वेश्या आमच्या जातीला कलंक आहात. तुमचा आमचा काहीसुद्धा संबंध नाही. तुम्हाला धर्मांतर करावयाचे असेल तर प्रथम हा धंदा सोडा. तुम्ही म्हणाल की आम्ही खायचे काय? तुम्ही खायचे काय? जगायचे कसे? हा प्रश्न माझा नाही. तुम्ही काय धंदा करावा हे सांगण्याचे माझे काम नाही. तुम्ही वाटेल ते करा. हा अधोगतीचा मार्ग सोडण्यास तयार असाल तरच धर्मांतराची गोष्ट बोला." या भाषणामध्ये बाबासाहेबांनी स्त्रियांना हा व्यवसाय का करावा लागतो याची चिकित्सा केली नाही, ती परिस्थिती कशी सुधारता येईल यावर उपाययोजना न सुचविता त्यांनी देवदासींनाच त्यांच्या परिस्थितीला जबाबदार ठरवले आणि आपला जीवनमार्ग सुधारा नाही तर कामाठीपुऱ्यातून उठवून

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 318 (CCCXVIII ) C
ISSN : 2278-9308
September, 2021

लावण्याची धमकी दिली. त्यामुळे सभेत हल्लकल्लोळ माजला. त्या स्त्रिया अद्वातद्वा बोलत व शिव्या देत रागाने निघून गेल्या. त्यानंतर आंबेडकरांनी त्या स्त्रियांचा प्रश्न कधीच हाती घेतला नाही."[3] आंबेडकरांचे स्त्रीविषयक कार्य हे फक्त दलित समाजातल्या स्त्रीवर्गापुरते मर्यादित न राहता हिंदू धर्मातल्या स्त्रियांसाठी केलेले दिसून येते. 'हिंदू कोड बिल' हे केवळ दलित स्त्रियांसाठीच नाही तर हिंदू स्त्रियांच्या हक्कांची ती सनद होय. आज या देशात देवदासींच्या प्रश्नाबाबत जेवढी चर्चा होत आहे, याचे सर्व श्रेय बाबासाहेबांकडे जाते. सर्वप्रथम देवदासीबाबत आवाज उठविण्याचे काम बाबासाहेबांनी केले. देवदासीसारख्या व्यभिचारी प्रथेला आळा बसावा म्हणून सतत संघर्ष केले, तो फुले-आंबेडकरांशिवाय कोणीही केला नाही. 1936 सालापर्यंत तरी स्त्रियांच्या प्रश्नांचा कधी अभ्यास केला नव्हता. त्यांच्या हयातीत त्यांचे जे लिखाण प्रसिद्ध झाले आहे यात, "हिंदू स्त्रियांच्या उन्नतीला व अवनीतीला जबाबदार कोण?"[4] हा लेख सोडला तर इतरत्र कुठेही स्त्रियांच्या प्रश्नांची चर्चा केलेली आढळत नाही. हा लेखही १९५१ सालातील आहे.

'हिंदू कोड बिल' विरोधकांनी पास होऊ दिले नसले तरी एक वेगळ्या टप्प्यावर त्यातील एक-एक कलम कायद्याचे रूप घेत आले आहे. हा आंबेडकरी स्त्रीमुक्ती विचारांचा विजयच म्हणावा लागतो. देवदासी, मुरळी ह्या प्रथांना विरोध दर्शविला. त्यांना घटनाबाह्य ठरविलेच. पण त्याचबरोबर वेठबिगार स्त्री-विक्री कायद्याने बंद झाली. कलम १४ व १८ नुसार स्त्री-पुरुषांत कोणताही भेदभाव न करता समानता प्रस्थापित केली. आजही अनेक क्षेत्रांमध्ये स्त्रिया मान उंच ठेवून ताठ मानेने कामगिरी करत आहेत. अनेक क्षेत्रे तिने काबीज केली आहेत. डॉक्टर, वकील, इंजिनिअर, प्राध्यापक ही तर सर्वसामान्य क्षेत्र झाली. पण याहून पुढचे पाऊल म्हणजे या देशातील कोणतीही स्त्री आपल्या मर्जीनुसार अपत्याला जन्म देऊ शकते किंवा नाही. पित्याचे नाव कोणतीच सक्ती नाही. सवती दुःख सोसायची स्त्रीला गरज नाही. यासाठी द्विभार्या प्रतिबंधक कायदा अंमलात आणला व बहुपत्निकत्वाची चाल बाद ठरविली. पित्याचा आणि पतीचा वारसा हक्क मिळवून दिला. दत्तक कायद्यानुसार एखादी मुलगीही दत्तक घेतली जाऊ शकते. हिंदूच्या वाईट चालीरितींवर कोरडे ओढून घटनात्मक प्रतिबंधक नियम टाकले. या सगळ्या सामाजिक सुधारणा करण्याचे श्रेय बाबासाहेबांना जाते. गिरणी मजूर, विडी मजूर, कष्टकरी, कामकरी स्त्रियांच्या वेतन-जीवनाचे शोषण थांबवून त्यांच्यासाठी अनेक सोयींचा मसुदा तयार केला. बाबासाहेबांनी केलेले हे कार्य स्त्री वर्गाला उच्च पदस्थ जाता यावे यासाठी केले. स्त्री वर्गासाठी मनापासून धडपडणारे, झगडणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे फक्त दलितांचेच कैवारी नाहीत तर ते स्त्रियांच्या उन्नतीसाठी झटणारे 'एक मूर्तिमंत'नवस्मृतिकार आहेत.

'मनुस्मृती'ने स्त्रियांना अनेक बंधनात अडकवून ठेवले. वेद्धाध्यायनावर मनुने बंदी घातली. स्त्रीला विद्याभ्यासाचा अधिकार नाही, तसेच तिला विचारांचे व आचारांचेही स्वातंत्र्य दिले नाही. स्त्रियांनी स्त्रियांच्या दृष्टीने फार मोठा आदर्श मनुस्मृतीने त्यांच्यासमोर ठेवला. नवऱ्याच्या इच्छेशिवाय तिने कोणतेही कार्य करू नये, नवऱ्याशी एकनिष्ठेने वागावे, नवरा व्यभिचारी असे तरी पतिव्रता स्त्रीने त्याला देव मानून त्याची पूजा केली पाहिजे, असा आदर्श मनूने स्त्रीसमोर ठेवला. पण आंबेडकरांना या गोष्टी मान्य नव्हत्या. स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाची जाणीव सतत त्यांना होत होती. हिंदू समाजव्यवस्थेने शुद्रांप्रमाणे स्त्रियांवर तितकाच अन्याय केला आहे. याची जाणीव झाल्यावर हा अन्याय दूर करून स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क मिळवून देण्यासाठी कंबर कसली. पं. नेहरूंनी भारताचे कायदेमंत्री म्हणून बाबासाहेबांची निवड केल्यावर स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने राजकीय हक्क देणारा देशाच्या राज्यघटनेचा मसुदा तयार केला आणि स्त्रियांना सामाजिक हक्क मिळावेत, असा मनाशी पक्का निर्धार करून हिंदू कोड बिलाचा पाठपुरावा केला.

महाड धम्मसंगराच्या वेळी बाबासाहेब स्त्रियांना उद्देशून म्हणाले होते, "तुमच्या कुशीत जन्माला येणे पाप समजले जाते. तुम्ही सत्याग्रहात भाग घेणार की नाही, हे निश्चित करा. तुम्ही आमच्या माय-बहिणी आहात, आपणास हीन म्हणून जो त्रास होतो आहे तो तुम्हास माहीतच आहे. आम्हाला लोकांनी हीन म्हटले तर तुम्हास वाईट वाटत नाही काय? आमच्या उन्नतीसाठी तुम्ही झटले पाहिजे. आपल्या मुलांना शिक्षण द्या, नवरा, मुलगा किंवा बाप-भाऊ दारू पिऊन घरात आला तर त्याला घरात घेऊ नका. जेवण देऊ नका. 'पुत्र व्हावा ऐसा गुंडा, त्याचा तिन्ही

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –7.675,Issue NO, 318 (CCCXVIII ) C
ISSN : 2278-9308
September, 2021

लोकी झेंडा' अशी महत्त्वाकांक्षा ठेवून संतती निर्माण करा."[5] यावरून स्त्रियांच्या मनात त्यांच्या अस्मितेची जाणीव निर्माण करून देण्यासाठी बाबासाहेब कळकळीने आपले विचार मांडताना दिसतात. आजही आपल्या कष्टाची परिसीमा न बाळगता मुलांना शिक्षण देणाऱ्या माता दिसून येतात. स्त्रियांविषयी असलेली तळमळ, विचारजागृती करण्यासाठी बाबासाहेबांची चालेली तडफड आणि स्त्रीजातीविषयी मनात असलेली कारूण्याची भावना याने ओतप्रोत भरलेल्या बाबासाहेब नावाच्या वादळाने झंझावाताने स्त्री वर्गासाठी अतुलनीय अशी कामगिरी केलेली दिसते.

अखिल भारतीय दलित परिषदेचे तिसरे अधिवेशन नागपूरला १८, १९, २० जुलै, १९४२ रोजी भरविण्यात आले होते. या अधिवेशनात २० ते २५ हजार स्त्रियांचा प्रचंड जमाव होता. त्यावेळी बाबासाहेब स्त्रियांना उद्देशून म्हणाले. "एखाद्या समाजाच्या स्त्रियांच्या प्रगतीवरून त्या समाजाच्या प्रगतीचे मोजमाप करता येते. आपण एवढ्या मोठ्या संख्येने आलात यावरून आपला समाज आता नक्कीच प्रगतीच्या मार्गावर आहे, यात शंका नाही." महिलांनी कसे वागावे व काय करावे, राहावे याबद्दल बोलताना ते म्हणाले, 'तुम्ही स्वच्छ राहा. सर्व दुर्गुणापासून दूर राहा. मुलांना शिकवून महत्त्वाकांक्षी बनवा. मुलांचे लग्न करण्याची घाई करू नका. त्यांना स्वत:च्या पायावर उभे होण्याइतपत लायक करा. त्यांची सहचरी बना. माझा हा सल्ला ध्यानात ठेवून वागलात तर तुम्ही स्वत:चीही उन्नती कराल आणि अस्पृश्य समाजालाही प्रगतीच्या मार्गावर न्याल."[6] या आधुनिक विचारांनी प्रेरणा घेऊन आज महिला कार्यरत आहेत.

"स्त्रीच्या समानतेवर गदा आणून त्यांना सतत मातृत्त्व बहाल करणाऱ्या पुरुषांना थोडी तरी समज यावी, या देशाच्या प्रगतीसाठी खीळ होणारी लोकसंख्या वाढू नये. स्त्रीचे दौर्बल्य नाहीसे होऊन तिलाही समाजात मिरवता यावे, स्त्री आनंदी व निरोगी राहावी यासाठी देशाला 'कुटुंब नियोजना'ची अत्यंत गरज आहे. हे या भारताला आवर्जून, ठामपणे सांगणारे ते पहिले एकमेव राजकीय पुरुष होते."[7] पण या त्यांच्या विचाराला विरोधकांनी धुडकावून लावले. पन्नास-साठ वर्षापूर्वी बाबासाहेबांनी जो विचार मांडला, त्याची आजही सर्वोच्च पातळीवर चर्चा होताना दिसत आहे. हा बाबासाहेबांच्या विचारांचा विजयच म्हणावा लागतो.

स्त्री जातीविषयी नेहमी अभिमान बाळगणाऱ्या बाबासाहेबांनी स्त्रिया या समाजाच्या प्रगतीसाठी फार मोलाची कामगिरी करू शकतात, हे मत मांडले. स्त्रीविषयी असलेला आदर त्यांनी वेळोवेळी व्यक्त केला. आजही स्त्रीया आपल्या मुक्तीची, स्वातंत्र्याची, निर्भीडपणाची, प्रगतीची भाषणे करताना दिसतात. बाबासाहेबांच्या वैचारिक वारसाचे जतन आजही या देशातील महिला वर्ग ज्ञात-अज्ञात स्वरूपात करताना दिसत आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वत: दलित असल्यामुळे दलितांप्रमाणेच समाजात हीन दर्जाची वागणूक देण्यात येणाऱ्या स्त्रियांबद्दल त्यांना अपार सहानुभूती होती. कुटुंबातील स्त्रियांचे हाल कमी व्हावेत म्हणून त्यांनी स्त्रियांना घटस्फोट, पोटगी, वडिलोपार्जित संपत्तीत वारसा, दत्तक घेणे वगैरे हक्क देणाऱ्या हिंदू कोड बिलाचा आग्रह धरून स्त्रियांना शिक्षणाचा हक्क नाकारून, अज्ञानाच्या अंधारात खितपत ठेवणाऱ्या हिंदू धर्माचा त्याग करून प्रौढ कुमारिका, विधवा, परित्यक्त्या, पतित आणि इतर स्त्रियांना ज्ञानसाधनेचा मार्ग उपलब्ध करून देणारा बौद्ध धर्म त्यांनी स्वीकारला. 'संततीनियमना'चा पुरस्कार आंबेडकरांनी केला. पाठोपाठ मुलांना जन्म द्यावा लागणाऱ्या स्त्रियांच्या दु:खाकडे त्यांचे लक्ष गेले. मोठ्या संख्येने मुले होणे, लागोपाठ मुले होणे, यामुळे अनेक स्त्रिया मृत्यूमुखी पडतात. रोगी व्यक्तींनी जन्माला घातलेल्या मुलांमध्ये, रोगट प्रजा निर्माण होते. यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एक महत्त्वाचा विचार मांडला. ते म्हणतात, "कोणत्याही कारणासाठी का होईना, ज्यावेळी एखाद्या स्त्रीची मुले होऊ द्यायची इच्छा नसेल त्यावेळी तिला ती गर्भधारणा टाळता येण्याची शक्यता असली पाहिजे आणि संतती जन्माला घालणे, हे सर्वस्वी तिच्या इच्छेवर अवलंबून असले पाहिजे. गरोदरपणाचा, बाळंतपणाचा आणि मुलांच्या संगोपनाचा भार स्त्रीलाच होतो, तेव्हा मुले केव्हा आणि किती होऊ द्यायची, हा निर्णय तिचाच असला पाहिजे."[8] हा विचार अलीकडच्या स्त्रीमुक्ती चळवळीशी संलग्न आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी अनेक प्रयत्न केले. हिंदू धर्मामध्ये स्त्रियांनी पशुतुल्य जीवन जगण्याची परंपरा होती. पुरुषांपेक्षा स्त्री ही कमी असते याचे तत्त्वज्ञान धर्ममार्तंडांनी

समाजात रूजवून ठेवले होते. या तत्त्वज्ञानाला विरोध पत्करून मुठमाती देण्यासाठी व स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समान हक्क, समान शिक्षण व आई-वडिलांच्या संपत्तीमध्ये समान अधिकार मिळाला पाहिजे, यासाठी 'हिंदू कोड बिल'संसदेमध्ये मांडून कायद्याने स्त्रियांना समान अधिकार बहाल करण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कायद्याच्या चौकटीतच राहून केले.

आपल्या असामान्य, अलौकिक आणि आदरणीय गुणांमुळे आणि कर्तृत्त्वामुळे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे चिंतनाचा, मननाचा, आदराचा, आनंदाचा आणि लेखनाचा विषय होत राहिले. स्त्रियांना पारंपरिक जोखडातून मुक्त करून त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे 'स्त्री स्वातंत्र्याचे उद्गाते' आहेत.

**संदर्भ ग्रंथसूची**


१) गायकवाड लक्ष्मण - 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : जीवन व कार्य (संकलन व प्रस्तावना)',प्रथमावृत्ती, २०१२, पृ. २३.

२) लिंबाळे शरणकुमार (संपा.) - 'प्रज्ञा सूर्य', डॉ. ज्योत लांजेवारकर (लेख), प्रचार प्रकाशन, प्रथमावृत्ती,१९९१, पृ. २०९.

३) पंडीत नलिनी - 'आंबेडकर', ग्रंथालय प्रकाशन, प्रथमावृत्ती, १९९६,

४) पंडीत नलिनी - तत्रैव, पृ. १९८.

५) लिंबाळे शरणकुमार (संपा.) - उनि, पृ. २१७.

६) लिंबाळे शरणकुमार (संपा.) - उनि, पृ. २१७.

७) लिंबाळे शरणकुमार (संपा.) - उनि, पृ. २१८.

८) गायकवाड लक्ष्मण - उनि, पृ. ७७.